# भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(दुपार)

जा.क्र. ६४०/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांकः—०४/१०/२०१६

**१) निष्काळजीपणाने मोटार सायकल चालविल्याने महीलेचा मृत्यु. :—**

दिनांक २४/०५/२०१६ रोजी १०.०० वा. दर. यातील मृतक भिमाबाई पुडलीक मस्के वय ६२ वर्ष रा. पांढराबोडी ही आरोपी सोबत त्याचे मोटार सायकलने स्मशान भुमी येथे जात असतांना आरोपीने त्याचे ताब्यातील मोटार सायकल हयगयीने, निष्काळजीपने भरधाव वेगाने चालवुन मृतकाचे मरणास कारणीभुत झाल्याने पो.स्टे. अजनी नागपुर येथुन मर्ग क्र. ००/१६ क. १७४ जाफौ चे कागदपत्र पो.स्टे. भंडारा येथे दि. २४/०९/२०१६ प्रमाणे प्राप्त झाल्याने मर्ग क्र. ५५/१६ क. १७४ जाफौ चे तपास वरून व चौकशी अहवाला वरून सरतर्फे फिर्यादी पोहवा. चोपकर यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ३०४(अ) भांदवि. सहकलम १८४ मोवाका. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास पोउपनि. शिंदे पो. स्टे. भंडारा हे करीत आहेत.

**२) क्षुल्लक कारणा वरून मारहान करून जिवे मारण्याची धमकी . :—**

दिनांक ०३/१०/२०१६ रोजी १५.०० वा. दर. यातील फिर्यादी हे आपले हेयर सलुन दुकानात ग्राहका सोबत मोबाईल सिम कार्ड संबधात बोलत असतांना यातील आरोपी हा फिर्यादीचे दुकानात जावुन मला सिम कार्ड पाहीजे असे म्हणुन फिर्यादी सोबत तोंडा तोंडी भंडण करून आपले जवळील लोखंडी चाकुने फिर्यादीस मारण्यास धावुन जिवाने मारण्याची धमकी दिल्याने व मा. जिल्हाधीकारी साहेब भंडारा यांचे कलम ३७(१)(३) मपोका. आदेशाचे उल्लंघन केल्याने फिर्यादी उमेश पुरूषोत्तम बुधे वय ३५ वर्ष रा. तुमसर यांचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन तुमसर येथे कलम ४/२५ भा.ह.कायदा सहकलम ५०६ भादंवि सहकलम १३५ मपोका. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. गोंडाने पो. स्टे. तुमसर हे करीत आहेत. आरोपी अटक आहे.

**३) अवैध दारु /जुगार अडयांवर धाडी . :—**

दिनांक ०३/०९/२०१६ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पो.स्टे. भंडारा व पवनी येथील अवैध दारु अडयांवर धाडी घालुन एकुण ०२ गुन्हे दाखल करुन आरोपीतांच्या ताब्यातुन ९०० मिली लिटर देशी दारु कि. २५०/—रु. तसेच जुगारातुन कि. ३५३/—रू. चा असा एकुण कि. ६,०३ /—रू. चा माल जप्त करण्यात आला.

( श्री.बी.आर.गाडे)
प्रभारी. पोलीस उपअधिक्षक(गृह)
भंडारा.
दुरध्वनी.क्र.८८०५१०१११२

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

प्रत, संगणक कक्ष, भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.